# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क.२५६५१४३ फॅक्स कं. ०७१२—२५६१६६३

E-mail:dternag_ngp@sancharnet.in Web:- rdtenagpur.org.in


स्मरणपत्र क्र. १

क्रमांक :—तंशिस/प्राकाना/शैवि२/प्रवेश प्रक्रीया—पदविका/२०१२/ 864

दि. 22 MAR 2012

प्रति,
प्राचार्य,

..............................................
..............................................
..............................................
..............................................

(पदविका अभियांत्रिकी / औषधनिर्माण / हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉ /आर्कीटेक्चर/प्रिंटींग/डी.एम.एल.टी अभ्यासक्रमाच्या सर्व खाजगी विनाअनुदानित संस्था )

विषय:— शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी / औषधनिर्माण /हॉटेल मॅनेजमेंट कॅटरींग टेक्नॉलॉजी / आर्किटेक्चर अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसंबधी शपथपत्र सादर करणेबाबत.

संदर्भ :— मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/तंशिसं/पदविका/२०१२/ १३३, दि. ०७/०३/२०१२.

शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी/औषधनिमार्णशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट कॅटरींग टेक्नॉलॉजी/आर्किटेक्चर इ. पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीया राबविण्यांत येणार आहे.

त्या अनुषंगाने सर्व खाजगी विना अनुदानित संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मधील पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये आपली संस्था सहभागी होणार किंवा नाही याबाबतचे रु.१००/— च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत (Notarized) हमीपत्र/शपथपत्र दि. ०५/०४/२०१२ पर्यंत खास दुतामार्फत पाठविण्याची कार्यवाही करावी. सदर शपथपत्रावर संस्थेचे/ट्रस्टचे अध्यक्ष/सचिव आणि संस्थेच्या संचालक/प्राचार्याची शिक्कासह स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

सदरहू माहिती या कार्यालयास विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास, आपली संस्था २०१२—१३ या शैक्षणिक वर्षासाठी शासनाचे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमध्ये सहभागी होणार नाही असे समजण्यांत येवून तसा अहवाल संचालनालयास सादर करण्यांत येईल, याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.